(कार्यालयीन कामासाठी) (नगरसचिव कार्यालय)

मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव.

मौलाना अबुल कलाम आजाद प्रशासकीय भवन,भुईकोट किल्ल्या समोर, रविवार वॉर्ड,ता. मालेगाव.

महासभा नोव्हेंबर -२०२६

सभा क्र.०८ **सुचना** **कार्यपत्रिका क्र.०८**

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ महापालिकेचे कामकाज नियम क्र.१ (क) अन्वये, मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार मालेगांव शहर महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण **सभा क्र. ०८ दिनांक १३/११/२०२६, शुक्रवार रोजी दु.३:३० वा** महानगरपालिकेच्या साथी निहाल अहमद सभागृह येथे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. करीता सर्व सन्माननीय पालिका सदस्य व सर्व संबंधितांना विनंती की, प्रायोजित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहुन सहकार्य करावे.

सदर सभेस खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्र. ११३ :- मा.महापौर यांचे शिफारशीने व श्री.मोहम्मद खालीद अब्दुल रशीद यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिकेत रक्कम रू.१२७ कोटी रक्कमेच्या डिपी.रोड करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाचा करारनामा व कार्यादेश देखील देण्यात आला असून. सदरील डी.पी.रोडचे कामास सुरूवात करण्यात आली आहे. परंतू डिपी रोडच्या ज्या रस्त्यांना मंजूरी देण्यात आली आहे अशा डी.पी. रस्त्यांपैकी ४ ते ५ रस्त्यांच्या ठिकाणी पाण्याच्या पाईप लाईनचे काम अजून झालेले नसल्याने ज्या ठिकाणी पाईप लाईनचे काम करणे बाकी आहे. अशा सर्व ठिकाणची कामे रखडली असून सदर ठिकाणी तातडीने पाईप लाईनची कामे करणे अत्यावश्यक असल्याने याकामी सकारात्मक कार्यवाही करून तशी तरतूद करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(साजिद अहमद हसन अब्बास)
नगरसचिव
मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

टिप:- कार्यालयीन वेळेत विषया संदर्भातील कागदपत्र नगरसचिव विभागात पहाण्यासाठी उपलब्ध आहेत.
सदर सभेबरोबर तहकुब सभा क्र. ०७ घेण्यात येईल.
नगरसचिव जा.क्र. ३४८ / २०२६
दिनांक ०४ /११/ २०२६

प्रति,
मा.सदस्य/सदस्या

Scanned with OKEN Scanner